**मजकुर :—**

दिनांक २५/०६/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **" Best Detection of the Month "** माहे एप्रिल —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ एप्रिल —२०२४

| | | |
|---|---|---|
| **०२** | **क्क्ष—०७, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई** | **घाटकोपर पो.ठाणे गु.र.क्र ५१८/२०२४ —कलम — ३०२ भादवी सह १३५,३७(१)(अ) महाराष्ट्र पोलीस अधिनियम,** |

**—: " जिवे ठार मारणे ":—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमूद गुन्हयांत दि. २१/०४/२०२४ रोजी इंदीरानगर, गोळीबार रोड, घाटकोपर (प), मुंबई या ठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने कोणत्यातरी अज्ञात कारणावरून फिर्यादीचा मुलगा नामे कु श्रवण गणेश साळवे, १६ वर्षे याचेवर कोणत्यातरी धारदार शस्त्राने वार करून गंभीर प्राणघातक जखमा करून त्यांच्या मुलाचा खुन केला म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री गणेश सुकडाजी साळवे, ४९ वर्षे |
| बळीत व्यक्ती | :— | श्रवण गणेश साळवे, वय १६ वर्षे |
| आरोपी अटक व दिनांक | :— | ऋषीकेश गणेश गुरव, वय—१९ वर्षे<br>आ.अ .दि.२२/०४/२०२४, |

**तपास कौशल्य :—** दि. २१/०४/२०२४ रोजी दुपारी ०५:४५ वा.च्या सुमारास सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा असल्याने तसेच आरोपीदेखील अनोळखी इसम असल्याने मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), बृहन्मुंबई यांनी सदर गुन्हयाची गंभीरता ओळखुन सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या तोंडी सुचना दिलेल्या होत्या. सदरचा गुन्हा हा अल्पवयीन मुलाबाबत तसेच गंभीर स्वरूपाचा असल्याने मा.पोलीस उप आयुक्त, (प्रकटीकरण—१), गुन्हे शाखा, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू केला.

आरोपीत इसमाबाबत कोणतीही माहीती उपलब्ध नसल्याने प्रथम अनोळखी आरोपीत इसमाची ओळख पटवुन त्याचा शोध घेण्याकरीता मा.पोलीस उप आयुक्त, (प्रकटीकरण—१), गुन्हे ाखा, मुंबई यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त(डी—पुर्व), गुन्हे शाखा, मुंबई व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कक्ष—७, गु.प्र.शा, गु.अ.वि.,घाटकोपर, मुंबई यांच्या नेतृत्वाखाली ०४ पथके तयार केली. सदर पथकांकडुन सी.सी.टी.व्ही. फुटेज पाहणे, आरोपीबाबत गोपनीय माहीती प्राप्त करणे, आरोपीचा तांत्रिक तपासाद्वारे शोध घेण्याचे प्रयत्न चालु झाले.

त्यानंतर सदर पथकांकडुन बळीत मयताचा मृतदेह मिळुन आलेल्या परिसरातील सी. सी.टी.व्ही.फुटेजची पाहणी केली असता, घाटकोपर परिसरातील गोळीबार रोडवरील एका फुटेज मध्ये घटनेच्या पुर्वी मयत अल्पवयीन मुलगा नामे श्रवण साळवे व त्याचेसोबत एक इसम चालत जात असताना दिसुन आले. सदर फुटेजचा फॉलोअप घेवुन सदर रस्त्यावर त्यापुढे असणारे सी.सी.टी.व्ही.कॅमेरे व.पो.नि.कक्ष—७, मुंबई यांच्यासोबतीच्या पथकाने तपासले असता, यापुर्वी बळीत मुलासोबत चालत असणारा इसम हा पळुन जाताना दिसुन आला. त्यामुळे पळुन जाणाऱ्या मुलाने सदरचा गुन्हा केला असल्याचा संशय बळावला. त्यावरून मयत श्रवण साळवे याच्या मित्र—मैत्रिणी तसेच घाटकोपर परिसरात रहावयास असलेल्या नागरिकांकडे नमुद पळुन जाणा—या इसमाचे फुटेज दाखवुन ओळख पटविली असता त्याचे नाव ऋषीकेश गणेश गुरव, असल्याची माहीती मिळाली.

घाटकोपर परिसरात शोध घेत असताना तो त्याचे कुटुंबियांसमवेत काही महिन्यांपुर्वी दिवा, जि.ठाणे येथे रहावयास गेल्याची माहीती मिळाली. त्यामुळे संशयीत आरोपीचा ोध घेण्याकरीता घाटकोपर स्टेशन, कुर्ला एल.टी.टी., ठाणे स्टेशन व दिवा स्टेशन येथे सी.सी.टी. व्ही.फुटेज पाहण्यासाठी पथके रवाना करण्यात आली. सदरवेळी दिवा स्टेशन येथे सी.सी.टी.व्ही.

पाहणा—या पथकास इसम नामे ऋषीकेश गुरव हा दिवा स्टेशन येथे उतरल्याचे दिसुन आले. त्याच दरम्यान आरोपीचे मोबाईल क्रमांक प्राप्त झाल्याने त्याचे लोकेशन घेतले असता सदरचे मोबाईल बंद मिळुन आले.परंतु सदर मोबाईलचे शेवटे लोकेशन हे दिवा, जि.ठाणे परिसरातील मिळुन आले.

त्यावरून तात्काळ सहायक पोलीस आयुक्त (डि—पुर्व), गुन्हे शाखा, मुंबई हे त्यांच्याकडील दोन पथकासह त्याच्या राहत्या घरी दिवा, जि.ठाणे परिसरात रवाना झाले. गोपनीय माहितीवरून आरोपीच्या राहत्या सद्‌गुरू अपार्टमेंट, पहीला मजला, मुंब्रा कॉलनी, दिवा, जि.ठाणे येथील घराचा पत्ता शोधुन त्याठिकाणी संशयीत इसमाचा शोध घेतला असता परंतु सदरचे घर बंद मिळुन आले.

त्यानंतर दिवा परिसरात संशयीत आरोपीच्या मित्र व नातेवाईकांचा शोध घेत असताना, संशयीत आरोपीचा शांती नगर झोपडपट्टीमध्ये धनराज नावाचा खास मित्र रहावयास असल्याची माहीती मिळाली. त्यावरून शांतीनगर झोपडपट्टी याठिकाणी पोलीस पथक रात्रौ ०२.०० वाजताच्या सुमारास गेले असता, त्याठिकाणी असंख्य चाळी मिळुन आल्या. रात्री चाळीतील घरे बंद असल्याने सशंयीत आरोपी ऋषीकेश गुरव व त्याचा मित्र धनराज याचा शोध घेण्यास मर्यादा येत होत्या.

संपुर्ण शांतीनगर झोपडपट्टी टॉर्चच्या सहाय्याने पिंजुन काढली असता, एका चाळीतील बंद रूमच्या बाहेर सी.सी.टी.व्ही. फुटेजमध्ये संशयीत आरोपी ऋषीकेश गुरव याने परिधान केलेली चप्पलेसारखी चप्पल दिसुन आली. सदर चपलेवरून संशय आल्याने त्याबाबत खात्री करण्यासाठी रूमचा दरवाजा वाजवुन आतील लोकांना रूमचा दरवाजा उघडण्यास सांगितले असता, दरवाजा उघडण्यास उशीर झाल्याने संशय आणखी बळावला. काही वेळाने आतुन दरवाजा उघडला असता, आत उपस्थित असलेल्या लोकांपैकी सी.सी.टी.व्ही.फुटेजमध्ये दिसणारा इसम ऋषीकेश गणेश गुरव, वय १९ वर्षे, हा मिळुन आला. त्याच्याकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने गुन्हयाची कबुली दिल्याने त्यास ताब्यात घेवुन कक्ष ७, गु.प्र.शा. गु.अ.वि., घाटकोपर, मुंबई येथे आणले व त्याची वैदयकिय तपासणी करून त्यास पुढील कार्यवाहीकरिता घाटकोपर पोलीस ठाणेच्या ताब्यात दिले.

अल्पवयीन बालकाचा खुन करून पळुन गेलेल्या गंभीर गुन्हयातील अज्ञात आरोपीस निष्पन्न करून व तो गाव—दिवा, ता.कल्याण, जि.ठाणे येथे असल्याचे तांत्रीक तपास व गोपनीय माहीतीवरून निष्पन्न केले. त्यांनतर आरोपीचा ठाव ठिकाणा कौशल्यापुर्वक शोधुन त्यास ताब्यात घेऊन नमुदचा गुन्हा १२ तासांचे आत उघडकीस आहे.

**गु.प्र.शा.गु.अ.वि.कक्ष—०७, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | स.पो.आ. | चंद्रकांत जावध | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | व.पो.नि. | महेश तावडे | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पो.नि. | आत्माजी सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | म.पो.नि. | राजश्री बाळगी | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोउपनि. | रामदास कदम | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पोउपनि. | स्वप्निल काळे | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पोउपनि. | महेश शेलार | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पोउपनि. | नामदेव परबळकर | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | स.फौ.क्र.३०९४१ | तानाजी उबाळे | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ह.क्र.३२८०७ | संतोष गुरव | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ह.क्र.९६०५५२ | शशिकांत कांबळे | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | पो.ह.क्र.९६०६३३ | अजय बल्लाळ | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ह.क्र.०३४६७ | सचिन गलांडे | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ह.क्र.००८२० | विनोद पांडे | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ना.क्र. ०६१९४० | विलास राऊत | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.शि.क्र. ०८०८७२ | विकास होनमाने | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.शि.क्र. ०९०४६४ | महेश सावंत | प्रशस्तीपत्रक |
| १८ | म.पो.शि.क्र.११२१५३ | हिना शेख | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ह.चा.क्र. ००६८८ | राजाराम कदम | प्रशस्तीपत्रक |

**मजकुर :—**

दिनांक २५/०६/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या '' **BEST CONVICTION OF THE MONTH** " माहे एप्रिल —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) १) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ एप्रिल — २०२४

| | | |
|---|---|---|
| ०२ | **नागपाडा पोलीस ठाणे, परिमंडळ—०३, मुंबई** | **गु.र.क्र. ५५८/२०२० कलम ३७६(अ)(ब) ३५४ भादवि सह ४,८,१२ पोक्सो अधिनियम २०१२** |

—: '' **लैंगिक शोषण करणे** '':—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात आरोपी राशिद रमजान अंन्सारी, वय २४ वर्षे, फिर्यादी श्रीमती वसिमा मसलेउदिदन शेख, वय ३५ वर्षे, यांची मुलगी मेहनाज, वय ५ वर्षे हिस '' चिज दिलाता हुँ '' असे अमिष दाखवुन तिची चडडी काडुन तिच्या गुप्तांगामध्ये जीभ घालुन तिच्या सोबत अश्लिल कृत्य केले म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | वसिमा मसलेउदिदन शेख, वय ३५ वर्षे, |
| बळीत | :— | अल्पवयीन मुलगी वय ५ वर्षे |
| निकाल दिनांक | :— | दि. २०/०४/२०२४ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | राशिद रमजान अंन्सारी, वय २४ वर्षे,<br>आरोपी अटक दिनांक १८/१२/२०२० रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | मा. न्यायालयाने आरोपीस २० वर्षे, कारावास व १०,००० रू दंड अशी शिक्षा सुनावली आहे |

**तपास कौशल्य** :— नमुद गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने फिर्यादी यांनी वर्णन केलेल्या इसमास पो उ नि जाधव व पथक यांनी पोलीस ठाणेस हजर केले. सदर इसमाकडे सखोल चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबुली दिल्याने त्यास मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचे तंतोतंत पालन करून नमुद गुन्हयात अटक करण्यात आली.

गुन्हयातील बळित मुलगी कु मेहनाज मसलेउदिदन शेख, वय ०५ वर्षे हिस फिर्यादी यांचेसह नागपाडा ५ मोबाईलद्वारे वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात आले. तसेच गुन्हयातील घटनास्थळी दोन लायक पंचांसमक्ष सविस्तर घटनास्थळ पंचनामा करण्यात आला.

गुन्हयामध्ये अटक करण्यात आलेल्या आरोपीस त्याची वैद्यकीय तपासणी करून सुरक्षिततेकामी सातरस्ता सर्वसाधारण कोठडी येथे ठेवण्यात आले. तसेच बळीत मुलगी नामे मेहनाज मसलेउदिदन शेख, वय ०५ वर्षे हिचा प्रश्नोउत्तर स्वरुपात जबाब नोंद काण्यात आला. तसेच साक्षीदार मसलेउदिदन मोहम्मद शेख,वय ४० वर्षे यांचा जबाब नोंद करुन गुन्हयाचे कागदपत्रा मध्ये समाविष्ठ करण्यात आला.

गुन्हयातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार १) श्रीमती आयेशाबी फारुक फोडकर, वय ५० वर्षे, २) श्री सौद फारुक फोडकर, वय २५ वर्षे, ३) श्री अमिन मोहम्मद इस्माईल शेख, वय ३५ वर्षे, यांना पोलीस ठाणेस बोलावनु त्याचे कडे सदर गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली व त्याचा जबाब नोंद करण्यात आला.

तसेच आरोपीताविरुध्द मा. न्यायालयात साक्षीदारांना वेळोवेळी उपस्थित करून योग्य ती साक्ष देण्यास मदत केली. तसेच सबळ पुरावा सादर केला. त्यामुळे मा. न्यायालयाने आरोपीतास २० वर्षे, कारावास व १०,००० रू दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

**नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई परिमंडळ —०३,तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | सहायक पोलीस निरीक्षक - | गिता सोळंकी | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | सफौ. २९१७० | संतोष कृष्णा परब | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | मपोशि क्र.०९१२९७ | दामीनी देविदास दाभाडे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोशिक्र.०९०६२१ | संतोष विठ्ठल उमवणे, | प्रशस्तीपत्रक |

**टिप:—** वरिष्ठ /प्रभारी पोलीस निरीक्षक, गु.प्र.शा.,गु.अ.वि., कक्ष—०७, आणि नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, Best Detection of the April – 2024 व Best Conviction of the April – 2024 या करीता निवड झालेनंतर राज्य स्तरावर गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न (Best Detection of Month) करीता प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र 'क' प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.

# Best Detection of the Month

## 'प्रपत्र 'क'

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | **Property offence** बाबतीत<br>**a)** गेलेला माल<br>**b)** जप्त/हस्तगत केलेला माल | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे<br>**a)** घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | **Inquest** पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | **DNA** टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | **CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence** बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | **Cyber Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | **FORENSIC Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | **Dog Squad** ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | **Fingerprint / Handwriting Expert** ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी **Portrait** बाबत **Expert** ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅंग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळख कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |

| | | |
|---|---|---|
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) **FIR** प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब,शवविच्छेदन अहवाल, आळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, Inquest पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणा साठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा.सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Conviction of the Month

## ‘प्रपत्र ‘ क ’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०५ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०६ | गुन्हयाचा निकाल दिनांक | |
| ०७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | फरार आरोपी अटक, सी.आर.पी.सी., कलम ८२,८३ नुसार कार्यवाही केली आहे का ? | |
| १० | प्रत्येक आरोपीला झालेली शिक्षा | |
| ११ | न्यायालयाने ज्या पुरावा साखळीचे आधारे शिखा दिली त्याबाबतची सविस्तर माहिती.<br>**A)** साक्षीदारांचे न्यायालयासमोर जबाब<br>**B)**पंचांचें न्यायालयासमोर जबाब<br>**C)** परिस्थितीजन्य पुरावा साखळी<br>**D)** तज्ञ व्यक्तीचे जबाब<br>**E)** वैज्ञानिक /तांत्रिक पुरावे<br>**F)** तपासी अंमलदार यांचे जबाब<br>**G)** पैरवी अधिकारी नाव व कामगिरी<br>**H)** सरकारी वकील नाव व कामगिरी | |
| १२ | तपास व अपराधसिध्दी करीता यांगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) मा.न्यायालयाचे निकालपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

२) गुन्हयाचे निकाल ज्या महिन्यामध्ये देण्यात आललो आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट अपराधसिध्दी बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव निकाल लागलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे

# INTEGRITY CERTIFICATE

Certified that the integrity of Mr/Mrs ……………………………………, Designation-…………………., Recommended for the award of **" Excellence in Investigation"** for the Month of ……..Year 2022 is above suspicion and that he / she was not concerned in any proceeding that was censured in a court of law. It is further certified that no judicial or departmental proceeding are being contemplated/pending against him / her similarly no vigilance case is being contemplated/pending against him/her. It is also certified that recommendee has not been given any Major Penalty/Minor penalty in the last Five year.

2. It is also certified that the character and antecedents (of the proposed awardee) have been duly verified and nothing adverse reported against him/her.

**Name:-**
Desiganation:- Addl. Commissioner of Police
…………. Mumbai
Contact No :- 022-
Date :- / /2024